**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक २०.०७.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**आर्थिक गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— फसवणुकीचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस अटक.**

फिर्यादी धनंजय रमेश थिटे, वय ४९ वर्षे, हे आय.आय.सी.आय. बॅक, झोनल कार्यालय, अजनी चौक वर्धा रोड, नागपुर येथे झोनल हेड म्हणून कार्यरत आहते. बॅके मार्फत सोन्याचे दागिने तारण—ठेव कर्ज देण्यात येते. बॅके मार्फत नेमणूक करण्यात आलेले व्हॅल्यूअर यांचे मार्फतीने सोन्याची शुध्दता व वजन तपासून ठरलेल्या दराप्रमाणे कर्ज देण्यात येते. गोल्ड लोन संबंधाने सोन्याची तपासणी करीता गोल्ड लोन ऑडीट करण्यात येते. बॅकेमार्फत मनिषनगर शाखा येथे लोन ऑडीट केले असता, तेथे तारण ठेवलेले सोने हे बनावट असल्याचे निदर्शनास आले. फिर्यादी यांनी सुंपूर्ण गोल्ड लोन ऑडीट करण्याचे आदेश दिले असता, बॅकेच्या एकुण ०९ वेगवेगळ्या शाखेमधील एकुण १५९ खाते धारकांनी बनावट सोन्याचे दागिने तारण ठेवून कर्ज उचल ठेव केली असल्याचे निदर्शनास आले. फिर्यादी यांनी चौकशी केली असता, जानेवारी २०२३ ते ऑक्टोंबर २०२५ दरम्यान बॅकेचे खातेधारक नामे सचिन रौत तसेच व्हॅल्यूअर नंदू खरवडे प्रथम ऑडीटर राजेंद्र शिळणकर, प्रमोद टेटे, धनंजय ढोमणे, शाखा प्रमुख पंकज केकतपूरे, व एकुण १५२ खातेधारक यांनी संगणमत करून कट रचून बनावट दागिने हे खरे असल्याचे भासवून बॅकेतून कर्ज घेवून आय.सी.आय.सी.आय. बॅकेचा विश्वासघात करून एकुण २३,१९,४१,७५१/—रू. ची आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे आरोपींविरूध्द कलम ४०६,४०९,४२०,४६८,१२०(ब),३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासामध्ये आर्थिक गुन्हेशाखा पोलीसांनी यापुर्वी आरोपी १) प्रमोद भैय्याजी टेटे २) राजेंद्र पुंडलिकराव शिळणकर ३) पंकज प्रभाकर केकतपुरे ४) नंदु श्रीहरी खरवडे यांना अटक केलेली होती. गुन्हयातील पाहिजे आरोपी दिनेश कृष्णराव नागपुरे रा. शेषनगर, नागपूर यास दिनांक २०.०७.२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. मा. न्यायालयातुन आरोपीची ०५ दिवस पोलीस कोठडी प्राप्त करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. पोलीस उपआयुक्त, आर्थिक गुन्हेशाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष तोकलवाड, पोअं. राघोजी चिलगर, भाऊराव देशमुख व मपोहवा योगिता पोटभरे यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमणा:— जिवे ठार मारणाऱ्या आरोपींना अटक.**

फिर्यादीचा भाऊ नामे अभिषेक गुड्डु धुर्वे वय ३० वर्ष रा. वैष्णोदेवी नगर, शिवशक्ती बारजवळ, कळमणा, नागपूर यांची आजीसासु तुलसीबाई गायगुवाल रा. पांडुरंग नगर, कमल किराणाजवळ, कळमणा, नागपूर यांचे संपत्तीचे कारणावरुन त्यांचे नातेवाईकांमध्ये आपसात वादविवाद सुरु होता. फिर्यादीचा भाऊ नेहमी त्यांना समजावीत होता. दिनांक १९.०७.२०२६ चे २२.३० वा. ते २३.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचा भाऊ अभिषेक हा व त्याची पत्नी व इतर नातेवाईकांसह पांडुरंग नगर येथे आजीसासुचे घरी गेला असता, तेथे बाजुला राहणारे आरोपी नातेवाईक १) दिनानाथ कल्लुराम निर्मलकर वय ३२ वर्ष २) संतोष गोवर्धन गायगुवाल वय ५० वर्ष ३) लक्ष्मी लालाजी पटेल वय ५५ वर्ष सर्व रा. पांडुरंग नगर, कमल किराणाजवळ, गुलशन नगर, कळमणा, नागपूर यांनी संगनमत करुन झगडा भांडण करुन फिर्यादीचे भावास मारहाण करुन गंभीर जखमी केले. जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी सागर गुड्डु धुर्वे वय २४ वर्ष रा. गल्ली क्र. ३४, संतोषनगर झोपडपट्टी, यशोधरानगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपींविरुध्द कलम १०३(१),३५२,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपींचा शोध घेऊन आरोपी क्र. १ व २ यांना अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे नवीन कामठी :—** दिनांक २०.०७.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, सईद नगर, रेल्वे पटरीजवळ, पोल क्र. १११९/७ ते ९ दरम्यान, रेल्वे पटरीचे मधोमध एक अनोळखी पुरूष इसम वय अंदाजे ३० वर्षे वयाचे, रेल्वेने अपघात होऊन मृत अवस्थेत मिळुन आले. त्यांचा मृतदेह पुढील कार्यवाहीस्तव उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे पाठविण्यात आला आहे. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि. अक्षय झगडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे बेलतरोडी :—** श्रीमती सुधा उर्फ बेबी टिपरे वय ७९ वर्षे, रा. फ्लॅट क्र. १३६, विजयानंद सोसायटी, नरेंद्र नगर, बेलतरोडी, नागपूर ह्या दिनांक १२.०७.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरुन कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता

मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट, केस— पांढरे व लहान, अंगात— केसरी रंगाची साडी घातलेली आहे. विसरण्याची सवय आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे अंबाझरी :—** योगेश भारत पुनवटकर वय ३२ वर्षे, रा. पांढराबोडी, अंबाझरी, नागपूर हे दिनांक १७.०७.२०२६ चे १९.०० वा. बाहेरगावी जातो असे म्हणून पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरुन निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा— लांब, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट, केस—काळे, अंगात— टि शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— उजव्या हातावर ''योगेश'' नांव व गुलाबाचे फुल गोंदलेले आहे.

**३) पोलीस ठाणे कोतवाली :—** कमलेश देविसिंग परतेती वय २० वर्षे, रा. बसुरी पाकला ता. हरई जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश, हा दिनांक १६.०७.२०२६ चे १५.०० वा. पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील बडकस चौक येथून बेपत्ता झाला आहे. आजपावेतो घरी परत गेलो नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांब, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ६ इंच, केस—काळे, अंगात— निळा टि शर्ट व काळा लोअर पॅन्ट घातलेला आहे. ओळख — मुलगा मुका आहे.


श्रीमती सुधा


योगेश


कमलेश

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**